सकाळ

13 फेबुवारी-2013 बुधवार

# घटप्रभा फर्टिलायझर्सतर्फे ऊस पीक चर्चासत्र

**सकाळ वृत्तसेवा**

सांगली, ता. १२ : येथील घटप्रभा फर्टिलायझर्स व नवी पेठच्या आदित्य फर्टिलायझर्स अँड केमिकल्स यांच्यातर्फे पंढरपूर तालुक्यातील भैरवनाथवाडीमध्ये (जि. सोलापूर) नुकतेच दुष्काळामध्ये जिद्दीने ऊस शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मार्गदर्शनासाठी ऊस पीक चर्चासत्र झाले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून डॉ. भास्करराव जाधव (माजी सहयोगी संशोधन संचालक, कोल्हापूर) उपस्थित होते. तसेच घटप्रभा फर्टिलायझर्सचे शशिकांत पुरमवार (संचालक), सुरेश साळुंखे (मार्केटिंग मॅनेजर), सतीश पाटील, लक्ष्मण धनवडे (उपसभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, पंढरपूर), धर्मराज नलवडे (सरपंच, भैरवनाथवाडी), महावीर देशमुख (शिवसेना उपजिल्हाध्यक्ष) आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमास शेतकरीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

जागतिक स्तरावरील ऊस शेती व इतर देशांच्या मानाने भारतातील ऊस उत्पादन, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर कमी पाण्यात ऊस शेती, योग्य उसाच्या जातीची निवड, सेंद्रिय व रासायनिक खत व्यवस्थापन इत्यादी मुद्यांवर डॉ. भास्करराव जाधव यांनी मार्गदर्शन केले.

रासायनिक खतांची स्थिती आणि भविष्यातील शेतीबाबत शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शनाची गरज राहील, असे श्री. शशिकांत पुरमवार यांनी सांगितले. मातीतील कमी होत असलेली मूलद्रव्ये व रासायनिक खतांचा असंतुलित वापर त्यांचे पिकांवर होत असलेले दुष्परिणाम याबाबत सुरेश साळुंखे यांनी मार्गदर्शन केले.

लक्ष्मण तात्या धनवडे, महावीर देशमुख यांनीही मार्गदर्शन केले. कंपनीचे प्रतिनिधी प्रवीण सोनवणे, विनायक कदम, राहुल कुलकर्णी उपस्थित होते. डॉ. सरडे यांनी आभार मानले.